INNOVATE • IMPACT • INSPIRE

Molbio Diagnostics Limited
(Formerly Molbio Diagnostics Private Limited)
Plot No. L-46, Phase II D, Verna Industrial Estate
Verna, Goa - 403722, India
+91 832 6724888 www.molbiodiagnostics.com

Date: September 07, 2026

To
BSE Limited ('BSE')
Listing Department
Corporate Relationship Department
Phiroze Jeejeebhoy Towers,
2nd Floor, Dalal Street,
Mumbai – 400 001
BSE Script Code: 544866

To
National Stock Exchange of India Ltd
Exchange Plaza,
Bandra-Kurla Complex,
Bandra (E), Mumbai 400 051
Symbol: MOLBIO

Subject: Submission of Newspaper Advertisements of Un-audited Financial Results for the quarter ended June 30, 2026.

Dear Sir/Madam,

This is to inform you that pursuant to the provisions of Regulation 33, 47 and other applicable provisions of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations") as amended, the Un-audited Financial Results of Molbio Diagnostics Limited ("the Company"), for the quarter ended June 30, 2026, has been published in "Financial Express" in all editions (English Newspapers) and in "Tarun Bharat" in Goa edition (Marathi Newspaper) on 07th September 2026.

The copies of the newspaper advertisements are enclosed herewith for reference. This intimation is also available on the Company's website at www.molbiodiagnostics.com in compliance with Regulation 46 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015.

You are requested to kindly take the same on record.

Thanking You.

Yours Faithfully,

For Molbio Diagnostics Limited

DARSHAN RAGHUNATH KAREKAR
Digitally signed by DARSHAN RAGHUNATH KAREKAR
Date: 2026.09.07 15:39:41 +05'30'

Darshan Raghunath Karekar
Company Secretary & Compliance Officer
M. No: F13569
Place: Verna-Goa

THE BIG IDEA
NEWME

The race for fresh fashion

HOW FOUR FOUNDERS BUILT A FASHION BUSINESS AROUND GEN Z'S NEED FOR CONSTANT NEWNESS

S SHANTHI

THE IDEA FOR NEWME began with a question: why should fashion take months to respond when consumer preferences can change every week?

For co-founders Sumit Jasoria, Shivam Tripathi, Vinod Naik, and Himanshu Chaudhary, the answer lay in a shift they were seeing among young consumers. Before launching NEWME in 2022, the founders spent considerable time studying consumer behaviour, particularly how it changes as economies grow and digital adoption deepens. They concluded that Gen Z would be a fundamentally different fashion consumer.

"They were discovering global trends in real time through Instagram, creators, pop culture and digital communities," said Jasoria, co-founder and CEO, NEWME. But while consumers were moving faster, much of the fashion industry was still working on seasonal cycles, with trends taking months to reach the market.

That gap became the starting point for NEWME, an online-first fashion brand focused on Gen Z, offering frequently changing styles at relatively affordable prices. The founders wanted to build a business where fashion could respond to what consumers were interested in now, rather than what might have been popular months earlier.

"We wanted to empower young consumers with styles that reflect who they are today — not six months from now," Jasoria said.

The founders brought 10-12 years of experience in high-growth startups and e-commerce. Before committing capital, they tested their assumptions through consumer research and with a small group of interns. They also studied the fashion models of global players such as Zara and Shein, alongside research from consulting firms on the size of the fashion market and the growing influence of Gen Z as a consumer.

One conclusion stood out: the real differentiator would not simply be the ability to spot trends. It would be the supply chain required to turn those trends into products quickly.

"We learnt how global fashion brands become so big by controlling their supply chain and ensuring consistency across all the supply chain touchpoints," Jasoria said.

NEWME therefore built its operating model around speed and freshness. Its supply chain was designed to support more than 500 new styles every week, giving customers a reason to return frequently. "Fresh styles became like stone casting because we understood that freshness would define NEWME," he said.

The approach began showing signs of working early. The company remembers its first 500 orders as a milestone, but the more important signal came when it crossed 1,000 orders in a single day.

Between July 2022 and May 2023, revenue grew 7-9 times, while registered users reached 500,000 and the platform expanded its presence across Indian PIN codes.

The business was being built during a difficult period for startup funding. NEWME launched in July 2022, at the height of the funding winter, when investors were increasingly demanding evidence of traction. The company had nevertheless raised $1 million before launch. Since then, it has raised about ₹210-215 crore from investors including Accel, Fireside Ventures and AUM VC.

The business has also begun to build the physical infrastructure behind its model. Some early suppliers who backed the company eventually helped it move towards manufacturing, leading to the setting up of its own factory.

The facility now produces more than 100,000 pieces a month. NEWME reported operating revenue of ₹175 crore in FY25.

The move into physical retail came in July 2023, when NEWME opened its first store in Bengaluru. For the founders, this was another test of their original thesis: that Gen Z's fashion experience would not necessarily remain confined to a screen. The company has since expanded to 25 stores across 14 cities.

The physical network also gives NEWME another channel to understand its customer and test products. But the underlying proposition remains the same, which is to identify what young consumers are responding to and get it to them quickly.

"Our biggest competitive edge is our ability to combine technology, trend intelligence and supply chain to move at the pace of Gen Z," Jasoria said.

That, ultimately, is the business NEWME set out to build: not another fashion brand chasing the next trend, but a fashion company whose operating system is designed around how quickly the next trend can emerge.

(L-R) Co-founders Vinod Naik, Sumit Jasoria (also CEO), Himanshu Chaudhary and Shivam Tripathi

THE MOVE INTO PHYSICAL RETAIL CAME IN JULY 2023. SINCE THEN, THE COMPANY HAS EXPANDED TO 25 STORES ACROSS 14 CITIES

India, China hold Corps Commander-level talks

- First meeting between senior army officers in recent months

AMRITA NAYAK DUTTA
New Delhi, September 6

DE-ESCALATION EFFORTS

- Lt General Girish Kalia, commander of the Army's III Corps met his Chinese counterpart and other officers
- Indian troops continue to remain deployed in large numbers in the area to prevent any escalation
- The talks follow a meeting in Beijing on Aug 25 between NSA Ajit Doval and Chinese Foreign Minister Wang Yi
- India and China held the 23rd round of Corps Commander-level meetings in October 2025

INDIA AND CHINA conducted Corps Commander-level talks in Arunachal Pradesh on Sunday amid reports of recent tensions in the Taksing area of the Upper Subansiri district.

Lt General Girish Kalia, commander of the Army's III Corps, also called the Spear Corps, with its headquarters at Rangapahar near Dimapur in Nagaland, was meeting his Chinese counterpart and other officers.

The talks were being held at the Wacha-Damai border meeting point on the Indian side to address ongoing issues along the LAC in the area.

According to sources, Indian troops continue to remain deployed in large numbers in the area to prevent any escalation.

What makes the talks significant is that it is the first senior military commander-level talks between India and China in recent months amid tensions along the LAC in Arunachal Pradesh. These talks follow a meeting in Beijing on August 25 between National Security Advisor Ajit Doval and Chinese Foreign Minister Wang Yi who are the special representatives of the two countries for the boundary talks.

Moreover, Chinese President Xi Jinping is expected to attend the BRICS summit in New Delhi on September 12-13. Xi last visited India in October 2019 when he travelled to Mamallapuram near Chennai for the second informal bilateral summit of leaders.

New Delhi and Beijing have been trying to restore ties that plummeted after the start of the military standoff along the LAC in eastern Ladakh in 2020.

India and China have held 23 rounds of Corps Commander-level meetings at the Chushul-Moldo border meeting point in eastern Ladakh to resolve issues related to the military standoff along the LAC.

The 23rd round of talks were held in October 2025, a year after both sides formally agreed on patrolling arrangements in the Depsang Plains and Demchok, the two friction points along the LAC.

Prime Minister Narendra Modi and President Xi met on the sidelines of the BRICS Summit in Kazan, Russia, in October 2024, and their talks resulted in the disengagement of troops from the friction points.

India and China have differing perceptions of the LAC, which has historically caused issues between their troops on the ground.

On Saturday, former Chief of Defence Staff Lt Gen Anil Chauhan (retd) commented on the Corps Commander-level talks and the establishment of two additional military hotlines, describing these developments as positive.

Isro bedrock of our space sector: INSPACe

PRESS TRUST OF INDIA
New Delhi, September 6

THE ROLE OF the Indian Space Research Organisation (Isro) is by no means diminishing and it will remain the bedrock of India's space sector, Pawan Goenka, chairperson of the Indian National Space Promotion and Authorisation Centre (IN-SPACe), said on Sunday.

IN-SPACe, an autonomous agency under the Department of Space, promotes, enables, authorises and supervises various space activities of non-governmental entities.

In an X post, Goenka said, "The reforms since 2020 are about expanding India's overall space ecosystem. The idea is to let industry increasingly manufacture and scale mature launch vehicles, satellites and other systems." Meanwhile, the Isro will focus on advanced research and development, scientific missions, strategic missions, new technologies and infrastructure that is too complex for the private sector to develop on its own, he added.

Goenka's comments came after nine employee associations at the Isro wrote to the space agency's chairperson, V Narayanan, seeking an official clarification on the proposed transfer of its manufacturing and operational functions to private entities.

आमदार गोविंद गावडे, म्हापशात श्री महारुद्र नाट्यमंडळ आयोजित कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन

युवापिढीने कीर्तनाद्वारे व्यक्तिमत्व घडवावे


म्हापसा : कीर्तन महोत्सवात बोलताना आमदार गोविंद गावडे. बाजूला दै. 'तरुण भारत' गोवा आवृत्ती संपादक सागर जावडेकर, ह. भ. प. उद्धवबुवा जावडेकर, ह. भ. प. हरिहर नातू, अध्यक्ष गोविंद शिरोडकर, जयंत सिरसाट, जयेश केणी, जगदीश म्हापसेकर, अवधूत कवळेकर. दुसऱ्या छायाचित्रात कीर्तन सादर करताना ह. भ. प. सौ. संज्योत केतकर..

कीर्तन म्हणजे प्रबोधनाचे एक ज्ञानपीठ आहे. कीर्तन थोडसं ऐकलं तरी आपल्या डोक्यातील टेन्शन खूप कमी होत. म्हणून आजच्या धगधगत्या युगामध्ये आध्यात्माशिवाय पर्याय नाही. मंदिराच्या प्रांगणातून आरती, अभंग, कीर्तन एकल्यावर मनशांत होते. त्यामुळे आजच्या युवकांनी कीर्तनाचा मार्ग स्वीकारावा आणि आपले व्यक्तिमत्व घडविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावा, असे प्रतिपादन प्रियोळचे आमदार गोविंद गावडे यांनी म्हापसा येथील हनुमान नाट्य सभागृहात बोलताना केले.

त. भा. प्रतिनिधी

सुहासबुवा वझे यांचे कार्य अभिनंदनास्पद

ह. भ. प. सुहासबुवा वझे यांनी आज गोव्यामध्ये कीर्तनासंबंधी क्रांतिकारी पाऊल टाकून इतिहास घडविला आहे. जोशी व वझे काकांनी कीर्तन हे समाज प्रबोधन आहे, ते सर्वांसाठी आहे. त्याचे प्रबोधन, प्रवचन व्हायला हवे हा सुंदर विचार त्यांनी समोर आणला आहे. गावागावात लहान मुलं कीर्तन सांगतात व त्यांच्या वाणीतून आणि त्यांच्या अथक प्रयत्नातून समाजाचे प्रबोधन होते. त्यासाठी सुहासबुवा वझे अभिनंदनास पात्र आहेत, असे गोविंद गावडे म्हणाले.

म्हापसा : श्री महारुद्र संस्थान, श्री महारुद्र प्रासादिक संगीत नाट्यमंडळ आयोजित कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन दै. 'तरुण भारत'चे गोवा आवृत्ती संपादक सागर जावडेकर यांच्या हस्ते समई प्रज्वलनाने करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने आमदार गावडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. उद्धवबुवा जावडेकर, ह.भ.प. हरिहर नातू, महारुद्र संस्थान अध्यक्ष गोविंद शिरोडकर, उपाध्यक्ष जयंत सिरसाट, सचिव जयेश केणी, खजिनदार जगदीश म्हापसेकर, उपमुख्यत्यार अवधूत कवळेकर उपस्थित होते.

गोविंद गावडे पुढे म्हणाले की, कीर्तनाऐवढेच पुस्तकही महत्त्वाचे आहे. वाचनामुळे आम्हाला खूप ज्ञान मिळते. वाचन संस्कृती जोपासली तर आयुष्यामध्ये येणाऱ्या प्रत्येक अडथळ्यावर मात करण्याची ताकद या वाचनामध्ये आहे. आपोआप यातून बळ मिळते. आज आम्ही काय बोलतो हे ऐकणारी पिढी आज नाही आहे, हे दुर्देव आहे, असे ते म्हणाले.

कीर्तन म्हणजे संस्काराचे मोठे भांडार : सागर जावडेकर

यावेळी सागर जावडेकर म्हणाले की, आपल्यावर पालकांकडून होणार संस्कार, घरातील वातावरणातून होणारे संस्कार, मंदिरामध्ये गेल्यावर भजन, पुराण, प्रवचन यातून होणारे संस्कार, शाळेमधील संस्कार आपण आयुष्यभर विसरु शकत नाही. आजच्या बदलत्या काळात संस्कार कुठे आहे हा नवीन प्रश्न उद्भवत आहे. कीर्तन हे असे माध्यम आहे जेथे संस्काराचे मोठे भांडार आहे. जगामध्ये भारतासारखी संस्कृती कुठेही सापडणार नाही. कीर्तनाने आपल्याला घडविले. गोव्यात कीर्तनाची फार मोठी परंपरा आहे. सुहासबुवा वझे यांनी मोठे कीर्तनकार शिष्य घडविले असून ती परंपरा आपण कायम जपली पाहिजे.

पहिल्या सत्रात ह.भ.प. सौ. संज्योत केतकर (पुणे) यांचे कीर्तन झाले. सूत्रसंचालन साहिली गर्दे यांनी केले. स्वागत अध्यक्ष गोविंद शिरोडकर यांनी केले तर आभार अवधूत कवळेकर यांनी मानले.

साळावली जलशुद्धिकरण प्रकल्प आज राहणार बंद

त. भा. प्रतिनिधी

सांगे : शेळपे, सांगे येथील १०० एमएलडी साळावली जलशुद्धिकरण प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे सोमवार ७ सप्टेंबर रोजी सकाळी ७ ते मंगळवार ८ सप्टेंबर रोजी सकाळी ७ पर्यंत प्रकल्प २४ तास बंद ठेवण्यात येणार आहे. या कालावधीत दक्षिण गोव्यातील विविध भागांतील पाणीपुरवठ्यावर अंशतः परिणाम होणार आहे, असे पेयजल विभागाने सांगितले आहे.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या अतिरिक्त १०० एमएलडी जलशुद्धिकरण प्रकल्पाला जोडण्यासाठी आवश्यक काम या कालावधीत करण्यात येणार आहे. हा प्रकल्प बंद ठेवण्यात येणार असल्याचा परिणाम सांगे तालुक्यातील नेत्रावळी, जांबावली, रिवण, सावर्डेतील गुड्डेमळ, शिरोडा, केपे, बाळ्ळी पंपिंग स्टेशन, गुडी तसेच मडगांव, फातोर्डा, राय, कासावली, नागोवा, कुंकळ्ळी, कुडतरी आणि नुवे या परिसरांतील पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. कुडाळी, दाबोळी, वास्को आणि मुरगाव मतदारसंघातील काही भागांनाही पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, याच भागांना पाणीपुरवठा करणारा १६० एमएलडी क्षमतेचा मुख्य साळावली जलशुद्धिकरण प्रकल्प सुरू राहणार आहे. कुडाळी, दाबोळी, वास्को आणि मुरगाव मतदारसंघातील शेवटच्या टोकापर्यंतच्या भागात पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी शटडाऊननंतर आणखी दोन दिवस लागू शकतात, असे विभागाने स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा आणि आवश्यक तेवढा पाणीसाठा करून ठेवावा, असे आवाहन पेयजल विभागाच्या कार्यकारी अभियंत्या हर्षा काकोडकर यांनी केले आहे.

प्रियोळ बेताळ मंदिरात ९ रोजी श्रावणी पूजा

त. भा. प्रतिनिधी

फोंडा : प्रियोळ म्हार्दोळ येथील श्री बेताळ मंदिरात श्रावण महिन्यातील वार्षिक पूजा बुधवार दि. ९ सप्टें. रोजी आयोजित करण्यात आली आहे. यानिमित्त सकाळी विविध धार्मिक विधी, सायं. ७ वा. कुंडई येथील सोहिरोबानाथ वारकरी मंडळातर्फे हरिपाठ नंतर पूजा, आरती व महाप्रसाद होणार आहे. भाविकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे पूजेचे यजमान मनोज म्हार्दोळकर यांनी कळविले आहे.

‘उज्ज्वला’साठी रविवारीही पंचायत कार्यालये खुली

अर्ज भरून देण्यासाठी लोकांची मोठी गर्दी, आमदार कार्यालयांमध्येही लागल्या रांगा

त. भा. प्रतिनिधी

पणजी : तीन घरगुती एलपीजी सिलिंडर मोफत देणाऱ्या गोवा उज्ज्वला योजनेच्या वेगवान कार्यवाहीसाठी काल रविवारी राज्यातील सर्व पंचायत कार्यालये सुट्टी असूनही सुरु होती. योजनेचे अर्ज घेण्यासाठी लोकांनी व प्रामुख्याने महिला वर्गाने तेथे मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. अनेक आमदारांनीदेखील त्यांची कार्यालये रविवारी सदर योजनेच्या अर्ज वाटपासाठी व भरुन परत देण्यासाठी खुली ठेवली होती.

या योजनेंतर्गत रु. ३००० ची रक्कम गॅस ग्राहकांच्या बँकेत थेट जमा होणार आहे. गॅसची जोडणी असलेल्या सर्व ग्राहकांसाठी ती योजना खुली असल्याने सर्व पंचायत कार्यालये, आमदार कार्यालयांमध्ये गर्दी असल्याचे व रांगा लागल्याचे दिसून आले.

योजनेच्या लाभासाठी लोकांची धावपळ!

- गॅस बूक, बँक पासबूक, मतदान, आधार कार्ड आवश्यक
- प्रती काढण्यासाठी झेरॉक्स दुकानातही गर्दी
- सरकार 'फास्ट ट्रॅक' पद्धतीने करणार कार्यवाही

या योजनेचे अर्ज सादर करण्यासाठी काही मर्यादित दिवसांची मुदत देण्यात आल्यामुळे अर्ज घेण्यासाठी आणि ते भरून परत देण्यासाठी गर्दी झाली. गॅस बूक, बँक पासबूक, मतदान कार्ड, आधार कार्ड ही चार कागदपत्रे अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. त्यामुळे त्यांच्या प्रती काढण्यासाठी झेरॉक्स दुकानातही गर्दी दिसून आली.

सदर योजनेकरीता लोकांची धावपळ सुरु असल्याचे समोर आले असून पुढील दोन–तीन दिवस अशीच धावपळ सुरु राहणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरची किंमत गेल्या काही महिन्यात वाढत जाऊन रु. ९५० ते रु. १००० च्या आसपास पोहोचली आहे. त्या सर्व गॅस ग्राहकांना दिलासा देण्यासाठी गोवा राज्य सरकारने सदर योजना लागू केली आहे. त्यांची कार्यवाही ‘फास्ट ट्रॅक’ पद्धतीने करण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विर्नोडा मूळपुरुष मंदिरात श्रावणी सोमवार

त. भा. प्रतिनिधी

पेडणे : भूतवाडी–विर्नोडा येथील मूळपुरुष मंदिरात दि. ७ सप्टेंबर रोजी श्रावणी सोमवार विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. यानिमित्त मंदिरात सकाळी ८ वाजता पुरोहितांच्या मंत्रोच्चारात देवदेवतांवर अभिषेक व पूजाविधी होणार आहे.

रात्री ८ वा. उत्तम प्रभाकर पार्सेकर पुरस्कृत मुळपुरुष क्रीडा आणि सांस्कृतिक मंडळाच्यावतीने ह. भ. प. विनोद च्यारी हे कीर्तन सादर करणार आहेत. त्यांना तबल्यावर तुळशीदास परब तर हार्मोनियमवर विष्णू कांबळी साथ करतील. यानंतर रात्री १० वा. मुळपुरुष क्रीडा आणि सांस्कृतिक मंडळाचे भजन होईल.नंतर नामांकित घुमट आरती गटाच्यावतीने घुमट आरती करण्यात येणार आहे.

माध्यमिक शाळेतील विद्यार्थीही आंदोलनाच्या तयारीत

शिक्षकांच्या बदलीचा निषेध, शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर बदली करण्याची मागणी

त. भा. प्रतिनिधी

पणजी : शिक्षक बदलीच्या निषेधार्थ उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी वर्गाने आंदोलन केल्यानंतर आता माध्यमिक शाळेतील (आठवी ते दहावी) मुलेदेखील तसे आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. काही शाळांमधील मुलांनी–पालकांनी तसा निर्णय घेतल्याचे वृत्त हाती आले आहे. त्या शिक्षकांना शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत शाळेतच ठेवावे व नंतर बदली करावी, असे त्यांचे म्हणणे आहे.

अनेक शाळांमधील आठवी ते दहावी इयत्तेत शिकणाऱ्या मुलांना शिकवणाऱ्या अनुभवी शिक्षकांची बढती व बदली करण्यात आली. त्यांच्या जागी बदली शिक्षक अजूनपर्यंत देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असून त्याचा फटका दहावीच्या विद्यार्थ्यांना जास्त प्रमाणात बसणार आहे. हायर सेकंडरीच्या विद्यार्थ्यांनी रस्त्यावर येऊन आंदोलने केल्यानंतर सरकार जागे झाले आहे. त्यांची आंदोलने पाहून आता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी देखील आंदोलनाचा कित्ता गिरवण्याचे ठरविले आहे. काही शाळांमधील पालकांनी त्यासाठी पुढाकार घेतला असल्याचे वृत्त हाती आले असून ते आता शाळेतील मुलांना घेऊन आंदोलनाच्या तयारीत आहेत.

ज्या शाळेतील शिक्षकांची बढती व बदली हायरसेकंडरीत करण्यात आली आहे त्यांच्या बढतीला विरोध नाही. तथापि ते शिक्षक अनुभवी होते म्हणून त्यांनी शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत तरी निदान शिकवावे आणि नंतर बढतीच्या ठिकाणी जावे, अशी मुलांची – पालकांची मागणी आहे. नवीन शिक्षक दिल्यास ते कंत्राटी तत्वावर असणार आणि नीट शिकवतील की नाही? याबाबत प्रश्नचिन्ह आहे. म्हणून मागणी मान्य करावी, अशी याचना पालकांसह मुलांनी केली आहे.

‘गोवा फर्स्ट’ला प्राधान्याचा पुनरुच्चार

शिक्षकांसाठी आयोजित ‘टाऊन हॉल’ कार्यक्रमात पाटकर, सरदेसाई, व्हिएगस आले एकत्र

त. भा. प्रतिनिधी

मडगाव : गोवा प्रदेश काँग्रेस समितीचे माजी अध्यक्ष अमित पाटकर यांनी मडगाव येथे शिक्षकांसाठी ‘टाऊन हॉल’ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला गोवा फॉरवर्ड पार्टीचे अध्यक्ष विजय सरदेसाई आणि ‘आप’चे विधिमंडळ पक्षनेते व आमदार वेंझी व्हिएगस उपस्थित राहिल्याने विरोधी पक्षांचे एक वेगळेच चित्र पाहायला मिळाले.

मडगाव : गोवा फर्स्टचा नारा देताना अमित पाटकर, आमदार विजय सरदेसाई व आमदार व्हेंझी व्हिएगस.

या कार्यक्रमात अमित पाटकर स्वतः केंद्रस्थानी होते. त्यांनी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या समस्या व चिंता सरकारसमोर मांडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले होते. आमदार सरदेसाई आणि व्हिएगस यांची उपस्थिती त्याला एक वेगळे राजकीय परिमाण देऊन गेली, विशेषतः अशावेळी जेव्हा गोवा फॉरवर्ड आणि ‘आप’च्या आमदारांमधील समन्वय अधिक स्पष्टपणे दिसून येत आहे. अलीकडील विधानसभा अधिवेशनादरम्यानही ‘लक्षवेधी सूचना’ मांडण्यासाठी हे दोन्ही पक्ष एकत्र आले होते.

विशेष म्हणजे गोवा प्रदेश काँग्रेस समितीच्या माजी प्रदेशाध्यक्षांनी हा कार्यक्रम आयोजित केलेला असूनही यात काँग्रेसचा एकही आमदार उपस्थित नव्हता. हे जाणीवपूर्वक घडले की योगायोगाने हे जरी स्पष्ट झालेले नसले, तरी हे चित्र दुर्लक्षित करण्यासारखे नव्हते. अमित पाटकर हे पारंपरिक पक्षीय सीमांच्या पलीकडे जाऊन मुद्द्यांवर आधारित जनसंपर्क साधण्यास इच्छुक असलेले काँग्रेस नेते म्हणून पुढे येत आहेत, तर दुसरीकडे सार्वजनिक मुद्द्यांवर गोवा फॉरवर्ड पक्ष आणि ‘आप’ यांच्यात अधिकाधिक एकमत होताना दिसत आहे.